Literacy for a Billion

Movie: Mangalsutra
Year: 1968

Song: Garodi Tu Garodi Tu
Lyricist: Shanta Shelke

गारूडी तू गारूडी तू
नागीण मी खेळते
गारूडी तू गारूडी तू
नागीण मी खेळते
पुंगीच्या तालावर
सुरांच्या झुल्यावर
पुंगीच्या तालावर
सुरांच्या झुल्यावर
खाली वरी डोलते
गारूडी मी गारूडी मी
नागीण ही खेळते
गारूडी मी गारूडी मी
नागीण ही खेळते
पुंगीच्या तालावर
सुरांच्या झुल्यावर
पुंगीच्या तालावर
सुरांच्या झुल्यावर
खाली वरी डोलते
हा... गारूडी तू गारूडी तू
नागीण मी खेळते
गारूडी मी गारूडी मी
नागीण ही खेळते

डोळयावरती भिडता डोळे
पंखपापणी झुकवी का
किती टाळले तरी टळेना
नजरा नजरी हुकवी का

डोळयावरती भिडता डोळे
पंखपापणी झुकवी का
किती टाळले तरी टळेना
नजरा नजरी हुकली का
मुक्याचीही भाषा रे
मोह जडी आशा रे
वचनास मी जागते
हा... गारूडी तू गारूडी तू
नागीण मी खेळते
गारूडी तू गारूडी तू
नागीण मी खेळते

दोन करांचा विळखा पडता
लाजेने का लाजावे
गोड गुलाबी चुंबन घेता
श्वास अधीर हे मोजावे
हो... दोन करांचा विळखा पडता
लाजेने का लाजावे
गोड गुलाबी चुंबन घेता
श्वास अधीर हे मोजावे
श्रृंगारात सजलेली
मूर्ती तुझी भिजलेली
गजरा जणू माळते
हा... गारूडी तू गारूडी तू
नागीण मी खेळते
हा... गारूडी मी गारूडी मी
नागीण ही खेळते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*